# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**धारिका क्रमांक : २०४४(१२)/६९७५/(१)/सात-अ**

**आयोगामार्फत** विविध विषयातील अधिव्याख्याता**, शासकीय कला संस्था, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा गट-अ (कला संचालनालय). उच्च व तंत्रशिक्षण विभाग** पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- चालु रिक्त व अनुशेषाची पदे**

| जाहिरात क्रमांक | विषय | एकूण पदे | खुला | अ.जा जा . | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/२०१६ | रेखा व रंगकला | १६+३■ | ३+२*+१☑ | १ | १+१*+१■ | १■ | १* | -- | १ | -- | ४+१*+१■ |
| | | एकूण १६ पदांपैकी १ पद अपंग चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू याकरीता आरक्षित | | | | | | | | | |
| १८/२०१६ | उपयोजित कला | २४+१■ | ७+५*+१☑ | १ | १+१* | १ | -- | १ | -- | -- | ३+२*+१☑+१■ |
| | | एकूण २४ पदांपैकी १ पद अपंग चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू याकरीता आरक्षित | | | | | | | | | |
| १९/२०१६ | शिल्पकला व प्रतिमानबंध | ३ | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २०/२०१६ | कला शिक्षक प्रशिक्षण | ३+१■ | १ | १ | -- | -- | -- | १ | -- | -- | १■ |
| २१/२०१६ | कला व हस्तव्यवसाय वस्त्रकला विभाग | ६ | २+२* | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | १* |
| २२/२०१६ | कला व हस्तव्यवसाय अंतर्गत गृहसजावट | २ | १ | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २३/२०१६ | कला व हस्तव्यवसाय धातुकाम | ३ | १+१* | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २४/२०१६ | कला व हस्तव्यवसाय मातकाम | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

* उपलब्ध असल्यास महिलासाठी आरक्षित, ☑ खेळाडुसाठी आरक्षित ■ अनुशेष

टिप :- शासनाने कळविल्यानुसार काही विषयांच्या अधिव्यख्यात्यांची मागासवर्गीयांची पदे **५० %** पेक्षा जास्त दिसत असली तरी मागणीपत्रातील एकत्रित रिक्त पदांचा विचार करता आरक्षण **५०%** च्या मर्यादेत आहे.'

(१) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक – एडीआर/२०११ /(१४/११)/तांशि-६, दिनांक १४ जानेवारी,२०११ नुसार अपंगासाठी पदे सुनिश्चित करण्यात आली आहेत. तथापि, शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रमांक- एडीआर२०१४/प्र.क्र.१६९/ तांशि-६, दि.१८/११/२०१५ नुसार कळविल्याप्रमाणे प्रस्तुत पदाकरीता खालील अपंगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

(अ) चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांग वायू (Locomotor disability or Cerebral Palsy).

(३) मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडूअसल्याची प्रमाणपत्रे क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत. खेळाडू उमेदवारांनी आपली सर्व खेळाची प्रमाणपत्रे एकाचवेळी संचालनालयाला सादर करावीत.

**३. वेतनश्रेणी-** रु १५,६०० – ३९,१०० + ग्रेड पे रु. ५४००/- , एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. **४५,०००/-**.

**४.** पात्रता:-

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२** कमाल वयोमर्यादा :- **(१) दिनांक १ ऑगस्ट, २०१६** रोजी ३५ वर्षे, मागासवर्गीयांसाठी **४०** वर्षे.

**(२)** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**(३)** The age limit may be relaxed in favour of candidates who possess exceptional qualifications or experience or both.

परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.३ शैक्षणिक अर्हता** व **अनुभव:-**

**4.3.1** Have passed the Secondary School Certificate Examination or an examination recognised as equivalent thereto;

**4.3.2** Possess a degree or diploma, at least in the second class awarded by a Statutory University in India or a diploma or certificate awarded by Government in the subject mentioned below in the second class; or any other equivalent qualification recognised in this behalf at least in the second class;

a. For the post of Lecturer in the department of Drawing & Painting - **A Degree or Diploma in Drawing & Painting**.

b. For the post of Lecturer in the department of Applied Art- **A Degree or Diploma in Applied Art.**

c. For the post of Lecturer in the department of Sculpture & Modelling **- A Degree or Diploma in Sculpture & Modelling**

d. For the post of Lecturer in the department of Teacher's Training – **A Degree in Fine Art or Applied Art or a Diploma in Drawing & Painting, Sculpture & Modelling, or Applied Art and Art Master's Certificate or Diploma awarded by the Government.**

e. For the post of Lecturer in the department of Art & Crafts ( Textile Design, Interior Decoration, Metal Work, Ceramic & Pottery ) – **A degree or Diploma or a Certificate awarded by the Government in Art and Crafts (Textile Design, Interior Decoration, Metal Work, Ceramic & Pottery** in the respective subjects **)**

**AND**

4.3.3 Have gained experience, after acquiring the qualifications mentioned above 4.3.2 of teaching Art in any institute of Art, recognised in this behalf or in statutory University or combined professional and teaching experience, for not less than **three years.**

4.3.4 Provided further that, for the posts of Lecturers in the department of Drawing and Painting, Applied Art, Arts and Crafts and Sculpture & Modelling preference may be given to candidates who possess an Art Master's Certificate or Diploma of the Government.

4.3.5 Provided also that, the requirement that the diploma should at least be in the second class may be waived in favour of persons working under the Directorate of Art of the Govt. who were appointed to their respective posts before the date of coming into force of rules:(i.e.16/02/1983)

4.3.6 Provided also that, if at any stage of selection, the Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite experience or higher basic academic qualification are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to the scheduled castes, scheduled castes converts to Buddhism, Scheduled Tribes, Denotified Tribes and Nomadic Tribes then, notwithstanding anything contained, in above clauses, the Commission may relax the requirement of class in the degree, diploma or other examination or the period of experience (to the extent 40%) set out therein and select suitable candidates belonging to such Castes or Tribes to fill up such vacancies.

4.3.7 **Explanation** - A Diploma or certificate, which does not specify the class awarded shall be treated as a diploma or certificate in second class.

टीप**- 'उमेदवारांनी शिकविण्याचा दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस विद्यापीठाची अथवा टेक्नीकलबोर्डाची (लागू असेल त्यानूसार) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा तो अनुभव ग्राह्य धरता येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.'**

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या किंवा अन्य योग्य निकषाआधारे, निकष निश्चित करून, अथवा चाळणी परीक्षेद्वारे, मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल **केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या** सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या https://www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६.** जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**७. कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या https://www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क : १) अमागास - रु. ५२३/- २) मागासवर्गीय - रु. ३२३ /-**

"आयोगाच्या धोरणानुसार मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटी व शर्तींची पुर्तता ( उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता इत्यादी ) केल्यासच अशा उमेदवारांची अराखीव पदावर शिफारस करण्यात येईल."

**९. अर्ज करण्याची पद्धत** :-

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ **पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://www.mpsc.gov.in या वेबसाईटद्वारे दिनांक १३ एप्रिल, २०१६ ते ३ मे, २०१६ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https:/www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच https:/www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :- (१) **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे** (२) **नेटबँकिंग** (३) **डेबिट कार्ड.** (४) **क्रेडिट कार्ड.** (५) **संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)**

९.६ https://www.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) " Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडिची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यावाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

**१०.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर,२०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीदवारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**१३.** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१४. मुलाखतीच्या दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा मुलाखत घेण्याचे नाकारण्यात येईल.**

१५. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच चलन काढण्याची कार्यवाही दिनांक 3 मे, २०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१६. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक 3 मे, २०१६, पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण** **श्रीधर पाठक**

**दिनांकः १३ एप्रिल, २०१६,** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**